# भजने आणि त्यांचे भावार्थ

## (भाग १)

### विषयसूची


卐 प.पू. भक्तराज महाराज यांचा संक्षिप्त परिचय ५

卐 प.पू. भक्तराज महाराज निर्देशित भजन-भावार्थ सुगमरित्या लिहिणारे कै. चंद्रकांत उपाख्य दादा दळवी ! ७

卐 गुरूंच्या मूळ तत्त्वाचे दर्शन घडवणारे एकनिष्ठ गुरुभक्त दादा दळवी ! १२

卐 ‘प.पू. भक्तराज महाराजांची भजने आणि त्यांचे भावार्थ’, हा साधक आणि भक्त यांच्यासाठी प्रासादिक ठेवा ! १५

卐 ‘भजन हे ओठांतून नव्हे, तर नाभीतून म्हणायला हवे’, हे प.पू. भक्तराज महाराजांकडून शिकणाऱ्या सौ. उल्का बगवाडकर ! १८

卐 प.पू. डॉ. आठवले अन् डॉ. (सौ.) कुंदा आठवले यांच्याप्रती कृतज्ञता! १९

卐 ग्रंथ प्रसिद्ध होण्यासाठी साहाय्य करणाऱ्या गुरुबंधू-भगिनींचे आभार २०

卐 प.पू. भक्तराज महाराज यांचे लीलासामर्थ्य आणि त्यांचे शिष्य डॉ. जयंत आठवले यांचे द्रष्टेपण ! २१

卐 ग्रंथातील लिखाणाच्या मांडणीविषयी काही सूत्रे २२

卐 भजनांची अनुक्रमणिका २३



परिपूर्ण अध्यात्मशास्त्र शिकवणारी

**सनातन संस्था**



卐 सत्संग, संस्कारवर्ग इत्यादींद्वारे धर्मशिक्षण

卐 ‘टी.व्ही.’वरील चर्चासत्रांद्वारे जागृती

卐 जून २०२१ पर्यंत १०९ साधकांना संतपद

卐 राष्ट्र, धर्म, साधना, आयुर्वेद इत्यादींविषयीचे ग्रंथ

**अवश्य भेट द्या : WWW.Sanatan.org ✆ ९३२२३१५३१७**

## ‘प.पू. भक्तराज महाराजांची भजने अन् त्यांचे भावार्थ’, हा साधक आणि भक्त यांच्यासाठी प्रासादिक ठेवा !

### प.पू. भक्तराज महाराज विरचित भजनांचे अलौकिकत्व !

‘प.पू. भक्तराज महाराज (प.पू. बाबा) म्हणायचे, ‘भजन हेच माझे जीवन आहे !’ प.पू. बाबांची गुरुसेवेची आत्यंतिक तळमळ, त्यांचा गुरूंविषयीचा अपार भाव, त्यांची अध्यात्मातील शिकवण इत्यादी सारे त्यांच्या भजनांमधून व्यक्त होते. प.पू. बाबांसारख्या उच्च कोटीच्या संतांनी भजने रचली असल्याने ती पुष्कळ चैतन्यदायी आहेत. त्यामुळे या भजनांद्वारे साधक आणि भक्त यांना विविध स्तरांवरील अनुभूतीही येतात. म्हणूनच प.पू. बाबांची भजने म्हणजे, एक अलौकिक, आनंददायी आणि चिरंतन असा ठेवा आहे.

### कै. चंद्रकांत (दादा) दळवी यांच्याकडून प्रस्तुत ग्रंथमालिकेच्या संबंधाने घडलेली अमूल्य गुरुसेवा !

साक्षात् परब्रह्मस्वरूप असलेल्या प.पू. बाबांचा सहवास त्यांच्या काही भक्तांना जवळून लाभला. अशाच भक्तांपैकी एक भक्त म्हणजे, कै. चंद्रकांत रामकृष्ण दळवी (दादा दळवी). दादांचे वैशिष्ट्य म्हणजे, त्यांची प्रकृती ही भक्तीमार्ग आणि ज्ञानमार्ग यांचा सुंदर संगमच होती. दादांनी प.पू. बाबांना वेळोवेळी प्रश्न विचारून किंवा प.पू. बाबांनी बोलण्याच्या ओघात केलेल्या विवेचनातून भजनांचे भावार्थ नीट समजून घेतले. दादांनी भावार्थांच्या आशयामध्ये स्वतःच्या लिखाणाची भर घालून, ते सूत्रबद्ध करून, सुगम अन् ओघवत्या भाषेत लिहिले. प.पू. बाबांनी बहुतांशी भजने ही त्यांच्या तात्कालिन मनोदशेला अनुसरून लिहिली आहेत. ती मनोदशा समजून घेतली, तर भजनांचा अर्थ उकलणे सोपे होते. दादांनी बऱ्याच भजनांच्या ठिकाणी प.पू. बाबांची तात्कालिन

मनोदशा वर्णन केलेली असल्याने त्या भजनांचा अर्थ समजणे सोपे झाले आहे. दादांनी काही भजनांच्या ठिकाणी विषयाला समर्पक असे अध्यात्मावर विवेचनही केले आहे. त्यामुळे भजनातील विषय कळायला आणखी साहाय्य झाले आहे. अशा प्रकारे 'प.पू. भक्तराज महाराज यांची भजने आणि त्यांचा भावार्थ' यांची ग्रंथमालिका सिद्ध झाली असून प्रस्तुत ग्रंथ हा या मालिकेतील पहिला ग्रंथ आहे.

सर्व साधक आणि भक्त यांना प.पू. बाबांच्या भजनांचे भावार्थ कळावेत, या तळमळीपोटी दादांनी केलेली ही केवढी मोठी गुरुसेवा आहे ! या सेवेवरून दादांची अध्यात्मातील प्रगल्भता आणि साधनेतील प्रगतीही लक्षात येते.

## भजनांचे भावार्थ समजून घेण्याचे महत्त्व

१. प्रत्येकाच्या मनाची अवस्था, भावाची स्थिती, भजनांचे अर्थ समजून घेण्याची क्षमता इत्यादींनुसार प्रत्येकाला भजनाचा वेगवेगळा अर्थ उलगडतो. दादांनी प.पू. बाबांच्या निर्देशानुसार लिहिलेले आणि वेळोवेळी प.पू. बाबांकडून पडताळून घेतलेले भावार्थ प्रस्तुत ग्रंथमालिकेत दिले आहेत. स्वाभाविकच हे भावार्थ सर्वार्थाने योग्य असून साधक आणि भक्त यांना भक्तीयोग, कर्मयोग, ज्ञानयोग, गुरुकृपेसाठी करायची साधना इत्यादींविषयी अनमोल मार्गदर्शन करणारे आहेत.

२. उच्च आध्यात्मिक पातळीच्या प.पू. बाबांची भजनेही त्यांच्या उच्च भावावस्थेतून साकार झालेली असल्याने त्यांच्या बऱ्याच भजनांचे अर्थ अनेक साधकांना पूर्णपणे आकलन होत नाहीत. अर्थ समजून घेऊन भजने म्हटली किंवा ऐकली, तर भजने म्हणण्याचा किंवा ऐकण्याचा आनंद द्विगुणित होतो, तसेच भावजागृतीही लवकर होते. या दृष्टीने ही ग्रंथमालिका साधकांसाठी अतिशय उपयुक्त आहे.

३. प.पू. बाबांसारख्या उच्च कोटीच्या संतांची भजने म्हणजे चैतन्याचा महास्रोतच ! सनातनचे अनेक साधक त्यांना होणारे आध्यात्मिक त्रास दूर

होण्यासाठी उपाय म्हणून प.पू. बाबांची भजने ऐकतात. अशा साधकांनी भजनांचे भावार्थ समजून घेऊन भजने ऐकल्यास त्यांचाही भाव जागृत झाल्याने त्यांना भजनांतील चैतन्य अधिक ग्रहण होईल. त्यामुळे त्यांना आध्यात्मिक त्रास असल्यास तो लवकर अल्प व्हायला साहाय्य होईल.

## कृतज्ञता

दादांमुळेच भजनांच्या भावार्थांचा हा ग्रंथ सिद्ध झाला आहे. यासाठी मी सर्व साधक आणि भक्त यांच्या वतीने दादांप्रती मनोमन कृतज्ञता व्यक्त करतो. दादांच्या कन्या सौ. उल्का बगवाडकर यांनी दादांनी केलेले भावार्थांचे लिखाण आम्हाला देऊन ‘ते ग्रंथस्वरूपात प्रसिद्ध करण्याच्या सेवेची संधी दिली’, यासाठी त्यांच्याविषयीही कृतज्ञता व्यक्त करतो.

## प.पू. बाबांच्या चरणी ग्रंथ अर्पण !

‘प.पू. बाबांच्या कृपेमुळेच आम्हा भक्तांकडून या ग्रंथाच्या प्रसिद्धीचे कार्य पूर्ण होऊ शकले’, याविषयी प.पू. बाबांच्या चरणी भावपूर्ण कृतज्ञता व्यक्त करून त्यांच्या चरणी हा ग्रंथ अर्पण करतो.’

**– डॉ. जयंत बाळाजी आठवले (प.पू. भक्तराज महाराज यांचा शिष्य)**

F (DW-BMBh-Bha-DD)


हिंदूसंघटन अन् हिंदु राष्ट्र-स्थापना यांसाठी

**हिंदु जनजागृती समिती**

- हिंदु राष्ट्र-जागृती सभा
- धर्मशिक्षणवर्ग
- स्वसंरक्षण प्रशिक्षणवर्ग
- आंदोलने
- राष्ट्र आणि धर्म जागृतीपर फलक प्रदर्शने




हिंदुत्वरक्षणात अग्रेसर : **HinduJagruti.org** ९३२२५३३५९५